# ९. योजनेचे नांव :- ट्रायसेम

ट्रायसेम योजना राज्य शासन व जिल्हा परिषद यांच्या ८५:१५ सहभागातून राबविल्या जाते.

<u>**योजनेचा उद्देश**</u> :- ग्रामीण भागातील बेरोजगार युवकांना तांत्रिक प्रशिक्षण उपलब्ध करुन त्यांना रोजगार व स्वयंरोजगार मिळवून देणे.

**प्रशिक्षणार्थी निवडीचे निकष :**

१) प्रशिक्षणार्थीचे वय १८ ते ३५ दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील युवक-युवती.

२) सदर प्रशिक्षण दारिद्रय रेषेखालील व दारिद्रय रेषेवरील कुटूंबातील युवक-युवतींना देण्यात येते.

३) दहावी पास व नापास

४) सेवायोजन नोंदणी क्रमांक धारक

५) कोणत्याही बँकेचे थकीतदार नसलेले

**प्रशिक्षणार्थींना मिळणारे लाभ :**

१) दारिद्रय रेषेखालील युवक-युवतींना प्रशिक्षण कालावधीत मासीक रु.५००/- विद्यावेतन दिल्या जाते.

२) प्रशिक्षण यशस्वीरित्या पुर्ण केल्यानंतर रु ८००/- ची टुल किटस् मोफत दिल्या जाते.

३) प्रशिक्षणार्थीची परिक्षा महाराष्ट्र राज्य, व्यवसाय शिक्षण परिक्षा मंडळ, मुंबई यांच्या मार्फत घेतल्या जाते व उत्तीर्ण होणा-या प्रशिक्षणार्थीस शासनामार्फत प्रमाणपत्र देण्यात येते.

४) प्रशिक्षण पूर्ण केलेल्या व स्वयंरोजगार करु इच्छिणा-या युवक-युवतींना स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेमार्फत कर्ज व अनुदान उपलब्ध करुन दिल्या जाते.

**प्रशिक्षण शुल्क :**

१) दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील युवक-युवतींना प्रशिक्षण मोफत दिल्या जाते.

२) दारिद्रय रेषेच्या वरील कुटूंबातील युवक-युवतींना रु ५०/- प्रती माह प्रशिक्षण शुल्क आकारण्यात येते. परिक्षा फी रु ३३०/- प्रशिक्षणार्थी आकारण्यात येते.

३) दारिद्रय रेषेखालील कुटूंबातील युवक-युवतींना परिक्षा फी रु ३३०/- आकारल्या जाते.

**प्रशिक्षण केंद्राचे ठिकाण व शिकविल्या जाणारे व्यवसाय :**

**मिनी आय टी आय, सावली**

१. दुचाकी वाहन २. वेल्डींग ३. घरगुती विद्युत उपकरणे दुरुस्ती

**ट्रायसेम प्रशिक्षण केंद्र, चंद्रपूर येथे**

१. सुतारकाम २. इले. मोटार रिवायडींग ३. वायरमन ४. रेडिओ टिव्ही दुरुस्ती.

**प्रशिक्षणार्थी निवडीच्या पध्दती :**

प्रशिक्षण घेवू इच्छिूक युवक-युवतींनी संवर्ग विकास अधिकारी यांचेकडे विहित नमुन्यात अर्ज सादर करावा. अर्जाचा नमुना विनामुल्य पुरविल्या जातो.